# धुळे महानगरपालिका,धुळे

मा.आयुक्त तथा प्रशासक
नगरसचिव कार्यालय

---

## प्रशासकीय महासभा क्रमांक २९

---

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सर्वसाधारण महासभेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणेसाठी **बुधवार दिनांक १०/१२/२०२५ दुपारी ४-३० वाजता स्व.दिलीप पायगुडे सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्रीमती अमिता दगडे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली. सदर बैठकीचे इतिवृत्त

सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| **अ.क्र.** | **अधिकाऱ्यांचे नाव** | **पदनाम** |
|---|---|---|
| १. | श्री. नितीन कापडणीस | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | श्रीमती करुणा डहाळे | अति. आयुक्त |
| ३. | श्री किशोर सुडके | सहा. आयुक्त |
| ४. | श्री शाहेद शेख मो. शेख | मुख्य लेखापरीक्षक |
| ५. | श्री सुनिलकुमार सुर्यवंशी | उपमुख्यलेखापरीक्षक |
| ६. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| ७. | श्री भटू पवार | प्र. सहा. संचालक नगररचना |
| ८. | श्रीमती संपदा कुलकर्णी | प्र. वैद्यकीय आरोग्यअधिकारी |
| ९. | श्री प्रदीप चव्हाण | कार्य.अभियंता |
| १०. | श्रीमती वर्षा घुगरी | कार्य. अभियंता स्थापत्य |
| ११. | श्री नवनित सोनवणे | कार्य. अभियंता पाणीपुरवठा |
| १२. | श्री.चंद्रकांत उगले | उप अभियंता, पाणीपुरवठा विभाग |
| १३. | श्री. एन. के. बागुल | उपअभियंता, विद्युत विभाग |
| १४. | श्री चंद्रकांत मोरे | प्र.लेखापाल, लेखा विभाग |
| १५. | श्री.प्रकाश सोनवणे | उप अभियंता, नगररचना |
| १६. | श्री.कमलेश सोनवणे | सहा. अभियंता नगररचना |
| १७. | श्री.हेमंत पावटे | सहा. अभियंता बांधकाम |
| १८. | श्री.विश्वंभर दासरवाढ | प्रशासन अधिकारी, मनपा शिक्षण मंडळ |
| १९. | श्री मधुकर निकुंभे | अधिक्षक, वसुली विभाग |
| २०. | श्री काळु साबळे | लिपीक, आस्थापना |
| २१. | श्री.सुर्यकांत हजारे | प्र. बाजार विभाग प्रमुख |
| २२. | श्री. प्रसाद जाधव | अधिक्षक अतिक्रमण विभाग |
| २३. | श्रीमती कल्पना जाधव | अभिलेखापाल |
| २४. | श्रीमती मिना सातभाई | समाज विकास अधिकारी |
| २५. | श्री राजेश वसावे | मुख्य स्वच्छता निरीक्षक |
| २६. | श्री.लक्ष्मण पाटील | मुख्य स्वच्छता निरीक्षक |
| २७. | श्री. गणेश खोंडे | प्रकल्प विभाग |

मा.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

**मा.प्रशासक:-** आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे.

विषय क्रमांक:-२१८ मागील प्रशासकीय महासभा क्र.२८ चे इतिवृत्त वाचून कायम करणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक २१८ दिनांक १०/१२/२०२५**

मागील प्रशासकीय महासभा क्रमांक २८ दिनांक १९/११/२०२५ च्या सभेतील धुळे मनपा प्रशासक ठराव क्रमांक २०९ ते २१७ अखेर क्रमश:वाचून कायम करण्यास मान्यता देण्यात येत आहे. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-२१९ प्रादेशिक पर्यटन विकास योजना सन २०२५-२६ अंतर्गत पांझरा नदीकाठी कॅफेटेरिया व फूड हब निर्माण करणे व सुशोभिकरण करणेकामी म.कार्यकारी अभियंता, पर्यटन संचालनालय, मुंबई यांना ना हरकत देणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता प्रादेशिक पर्यटन विकास योजना सन २०२५-२६ अंतर्गत पांझरा नदीकाठी कॅफेटेरिया व फुड हब निर्माण करणे व सुशोभिकरण करणेकामी शासनाकडुन दि.२८/१०/२०२५ अन्वये प्र.मा. प्राप्त झाली आहे. सदरचे काम हे म. कार्यकारी अभियंता, पर्यटन संचालनालय, मुंबई यांचेकडुन करण्यात येणार आहे. त्यांना नाहरकत दाखला देणेकामी सदरचा विषय मे. महासभेपुढे सादर झालेला आहे. यात जागा मालकी मनपाची आहे. तसेच देखभाल दुरुस्ती मनपाला करावी लागणार आहे. हे काम पुर्ण झाल्यानंतर ते मनपाकडे हस्तांतरीत होईल.

मा.आयुक्त तथा प्रशासक याबाबत नकाशे कोणाकडुन अॅप्रुव्ह करुन घेणार

मा.उपअभियंता संपुर्ण महाराष्ट्रात जेवढेपण प्रादेशिक पर्यटन विकास योजनेचे प्रस्ताव आहे ते सर्व शासनाकडुन होणार आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक आता जागेवर काय आहे.

मा.उपअभियंता जुनी चौपाटी आहे ती बंद पडलेली आहे. ती काढावी लागेल.

मा.आयुक्त तथा प्रशासक जुने स्ट्रक्चर आहे त्यांचे वाटप झाले आहे का ऑफिशिअली.

मा.उपअभियंता हो ८ ते १० वर्षापुर्वी बांधले होते तेव्हा त्यांचे वाटप झाले होते. परंतु आता त्यांचे करारनामे संपले आहे. ३ ते ४ ठिकाणी स्टॉल चालु आहेत आता.

मा.आयुक्त तथा प्रशासक याबाबत मालमत्ता कर विभागाने त्यांचे करारनामे तपासुन घ्यावे. तसेच जुने इमारत कर निर्लेखित करावे. तसेच हे काम पर्यटन संचालनालय यांनी जरी डेव्हलप केले आणि मेंटेनन्ससाठी येथील जे लाभार्थी आहे ते निश्चीत करण्याचा अधिकार मनपाकडे राहिल. आणि ईऑक्शन पध्दतीने आणि जागेवर जो कोणी असेल भाडेकरु रितसर ज्यांची मुदत संपलेली नाही त्यांचे समायोजन करावे आणि उर्वरित ईऑक्शन पध्दतीने लाभ देण्यात यावा. सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक २१९ दिनांक १०/१२/२०२५**

प्रादेशिक पर्यटन विकास योजना सन २०२५-२६ अंतर्गत पांझरा नदीकाठी कॅफेटेरिया व फूड हब निर्माण करणे व सुशोभिकरण करणे या कामास शासन निर्णय क्र.टीडीएस २०२५/१०/प्र.क्र.१०७/पर्यटन- १ दि.२८/१०/२०२५ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदर प्रकल्पाचे स्थान महानगरपालिका धुळे यांच्या कार्यक्षेत्रात येत असल्याने, प्रकल्प राबविण्यासाठी महानगरपालिकेची पूर्वपरवानगी तसेच प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर पुढील देखभाल दुरुस्ती करणे बाबतची परवानगी देण्यात यावी याबाबत म.कार्यकारी अभियंता, पर्यटन संचालनालय, मुंबई यांनी कळविले आहे.

उक्त काम पांझरा नदीकाठी कॅफेटेरिया व फूड हब निर्माण करणे व सुशोभिकरण करणे असून कामाची कार्यान्वयीन यंत्रणा पर्यटन संचालनालय असून त्याच्यामार्फत काम करण्यात येणार आहे. सदर प्रकल्प राबविण्यासाठी महानगरपालिकेची पूर्वपरवानगी तसेच प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर पुढील देखभाल दुरुस्ती करणेबाबत म.कार्यकारी अभियंता, पर्यटन संचालनालय, मुंबई यांना ना हरकत देणेकामी सदरचा विषय मे.महासभेपुढे ठेवणेबाबत म.आयुक्त यांनी निर्देश दिलेले आहेत.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, प्रादेशिक पर्यटन विकास योजना सन २०२५-२६ अंतर्गत पांझरा नदीकाठी कॅफेटेरिया व फूड हब निर्माण करणे व सुशोभिकरण करणेकामी म.कार्यकारी अभियंता, पर्यटन संचालनालय, मुंबई यांना ना हरकत देणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच याकामी सदर कामाच्या आराखडयांना नगररचना विभागाकडुन मान्यता घ्यावी. तसेच जुने बांधकाम निष्कासित करण्यापुर्वी बाजार विभागाकडुन यापुर्वी संबंधीतांशी झालेले करारनामे तपासुन घ्यावे. सदर काम पुर्णत्वास आल्यानंतर रेडीरेकनर दरानुसार ई ऑक्शन पध्दतीने दुकाने वितरीत करण्याचे व लाभार्थी निश्चीत करण्याचे तसेच अस्तित्वातील गाळेधारकांचे नियमानुसार समायोजन करण्याचे अधिकार मनपास राहतील. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-२२० धुळे महानगरपालिका मालकीची शाळा नं. ६ जुनी इमारत निष्कासित करून त्याजागी नव्याने BoT/ BoLT/ मनपामार्फत व्यापारी संकुल व शाळेचे बांधकाम करणे तसेच सदर कामी आर्किटेक्ट नेमणुक करणेसाठी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता धुळे मनपा मालकीची आग्रारोड येथे शाळा क्र. ६ आहे. शाळेचे बांधकाम जुने आहे. व क्षेत्रफळ ८००० स्क्वेअर फुट आहे. तेथे ४ ते ५ गाळे बांधुन होणार आहे. त्यामुळे येथे पार्किंगसाठी डेव्हलप केली तर योग्य राहिल असे विभागाचे मत आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक यात प्रॉपर्टी कार्ड चेक केले का नगररचना विभागाने. यात मनपाचा मालकी हक्कात उल्लेख असेल तरच हा प्रस्ताव पुढे पाठवा आणि पीपीपी चा देखील ऑप्शन ठेवा त्यामध्ये तसेच जी इमारत आहे ती हेरीटेज बिल्डींग नसेल याची खात्री करावी. तसेच कंसल्टंट नेमुन त्याचे आराखडे करा. मग कंसल्टंट सुचवेल की मेंटेनन्स साठी काही शॉप दाखवता येतील आणि पार्किंग दाखवता येईल का नाही. मनपाचे उत्पन्नही झाले पाहिजे. तसेच तेथे शाळा ही राहिली पाहिजे. जरी विद्यार्थी नसेल तर भविष्यात येवु शकतात कारण मुळ आरक्षण शाळा आहे. आपण रिडेव्हलप करायला सुरुवात केली तरी शाळेच्या काही खोल्या ठेवाव्या लागतील आणी त्यातच पैसे गेले आणि उत्पन्न काहीच नाही असे व्हायला नको. विभागाला वाटले प्रिफिजीबल रिपोर्टमध्ये हा प्रस्ताव मनपाच्या फायद्याचा आहे. तरच पुढची स्टेप घ्यावी. जर त्यात काही उत्पन्न नाही खर्च जास्त आहे व शासनाने अनुदान मिळत नाही तर यात पुढे जाऊ नये. पहिले प्रिफिजीबीलीटी चेक करावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक २२० दिनांक १०/१२/२०२५**

धुळे महानगरपालिका मालकीची आग्रा रोड येथील शाळा क्र. ६ चे बांधकाम हे जुने असून सदर ठिकाणी नव्याने शाळा तसेच व्यापारी संकुलाचे बांधकाम करणेबाबत पत्रान्वये मा.श्री.अनुपभैय्या अग्रवाल,आमदार धुळे शहर यांनी कळविले आहे.

शाळा क्र.६ हि आग्रा रोड येथे अस्तित्वात असून सदर ठिकाण शहरातील मुख्य बाजारपेठेतील आहे. सदर ठिकाणी शाळा तसेच व्यापारी संकुल बांधल्यास धुळे मनपाच्या उत्पनात भर पडणार आहे. सदर व्यापारी संकुल व शाळा यांचे बांधकाम करणे तसेच अस्तित्वातील शाळाची इमारत निष्काशित करणे आवश्यक आहे. तसेच सदरची ठिकाणी नव्याने शाळा बांधकाम तसेच व्यापारी संकुल बांधकाम करणेसाठी नकाशे अंदाजपत्रक तयार करणे या कामासाठी आर्किटेक्ट नेमणे आवश्यक आहे.

धुळे महानगरपालिका मालकीची आग्रा रोड येथील अस्तित्वातील शाळा क्र. ६ ची इमारत निष्काशित करून त्याजागी नव्याने BoT/BoLT/ मनपामार्फत शाळेचे बांधकाम तसेच व्यापारी संकुलाचे बांधकाम करणेस मंजुरी मिळणे व या कामासाठी धुळे महानगरपालिका पॅनलवरील आर्किटेक्ट यांची नेमणूक करणेकामी सदरचा विषय मे.महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, धुळे महानगरपालिका मालकीची शाळा नं. ६ जुनी इमारत निष्कासित करून त्याजागी नव्याने BoT/ BoLT/ मनपामार्फत किंवा पीपीपी तत्वावर व्यापारी संकुल व शाळेचे बांधकाम करणे तसेच सदर कामी शासन दरसुचीनुसार आर्किटेक्ट नेमणुक करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

तसेच तत्पुर्वी जागा मालकी तपासुन सदर बांधकामाचा प्रीफिजीबीलीटी रिपोर्ट तयार करुन उत्पन्न व खर्चाचा आढावा घ्यावा व त्यानुसार मनपा आर्थिक हिताच्या दृष्टीने निर्णय घ्यावा. तसेच सदर ठिकाणी दुकाने, पार्किंग व शाळा बांधकाम प्रस्तावित करावे. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-२२१ धुळे महानगरपालिका मालकीच्या खुली जागेत स्वखर्चाने जाहिरात फलक उभारणी करुन जाहिरातीसाठी वापरणे कामी वार्षिक जाहिरात परवाना शुल्क, जागा भाडे, लायन्स फी भरुन नविन होडिंग उभारणे यासाठी खाजगी ठेकेदार नियुक्त करणेचे प्रक्रीयेस तसेच जुने अस्तित्वातील व नवीन निविदेद्वारे प्राप्त झालेले दर समान करणेसाठी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.सहा.आयुक्त शहरात यापुर्वी सन २०१५-१६ पासुन २२२ होर्डिंग होत्या विकास कामांना अडचणींचे होत असल्यामुळे १०० होर्डिंग काढुन घेण्यात आले आहे. आता उर्वरीत ज्या जागा आहे त्या जागा देणेसाठी प्रस्ताव सादर केला आहे. त्या जागेवर होर्डिंग करता निविदा सादर केल्यानंतर १० वर्षांपासुन धुळे शहरातील होर्डिंगचे एकदाही दर वाढविले नसल्याने ९ मे २०२२ च्या सुचनेनुसार ३ वर्षाच्या आत भाडेवाढ करणे गरजेचे होते. त्यामुळे सदरचे दर वाढविणेबाबत विषय सादर झाला आहे. तसेच टेंडरही करायचे आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक टेंडर फलॅश झाले आहे का. आणि दर काय प्रस्तावित केले आहे.

मा.सहा.आयुक्त टेंडर फलॅश झाले आहे. दर पुर्वी रु. २० प्रती स्क्वेअर फुट होत आता रु. ४० प्रती स्क्वेअर फुट प्रति वर्षासाठी आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक या निविदेतुन किती उत्पन्न मिळेल.

मा. सहा. आयुक्त कमीत कमी ५० लाख मिळेल आणि कॉम्पीटीशन झाली तर वाढीवही मिळु शकते.

मा.आयुक्त तथा प्रशासक जाहिरात प्रसिध्दीत अट टाकावी की यात फक्त मनपाचे रस्तेच गृहीत धरले जावे. यात पीडब्लुडी, एनएचएआय इतर प्राधीकरण यांच्या रस्त्यांवर व जागांवर आपल्याला होर्डिंग उभारता येणार नाही. तसेच मुख्य चौक होर्डिंग मुक्त राहिले पाहिजे. जुने होर्डिंगचे दर रु. ४० प्रती स्क्वेअर फुट करावे. जुने होर्डिंग रिन्यु करतांना मुख्य चौकात नसावे. ते कमीत कमी २५ मिटर बाजुला असावे.

मा.सहा.आयुक्त आता अस्तित्वात असलेले जे होर्डिंग आहे ते मुख्य चौकात देखील आहे ते इतर प्राधीकरण याच्या रस्त्यांवर आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक त्यांना नोटीसेस बजावण्यात याव्या. मनपात जे फिक्स होर्डिंग लावले त्यांना लागणाऱ्या डाक्युमेंटची लिस्ट करावी. ते त्यांनी ४८ तासात मनपाकडे सादर करावे आणि मधल्या काळातील जी फि असेल ती ४८ तासात भरावी. अन्यथा अनधिकृत समजुन मनपाकडुन काढण्यात येतील व काढण्याचा खर्च त्यांच्याकडुन वसुल केला जाईल. तसेच इलीगल होर्डिंग काढण्याची तयारी सुरु ठेवावी. पेपर नोटीस जाहीर करावी. ईनिविदा जी फलॅश केली त्यात सुधारणा करुन घ्यावी. सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक २२१ दिनांक १०/१२/२०२५**

धुळे महानगरपालिका शहरात उपलब्ध स्वमालकीच्या खुली जागेवर स्वखर्चाने जाहिरात होडिंग उभारणी करुन जाहिरात प्रसिध्द करणेसाठी जाहिरात परवाना, शुल्क, जागा, भाडे, लायन्स परवाना फी वसुल करणेत येते या करीता सदर होडिंग या खाजगी मालक यांनी लावलेले आहेत.

सदर शहरातील अनाधिकृत अशा होडिंग काढणेत आलेल्या आहेत. त्यामुळे शहरात धुळे महानगरपालिका स्वमालकीच्या खुली जागा उपलब्ध असुन सदर जागेवर खाजगी

ठेकेदार नियुक्त करुन त्यांचे स्वखर्चाने जाहिरात होडिंग उभारणी करणे करीता परवानगी दिल्यास त्यामध्ये महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होऊन आर्थिक फायदा होणार आहे.

तसेच सदर होडिंग करीता जाहिरात कर, जागा भाडे, अनामत रक्कम हे दर स.न.२०१५-१६ पुर्वी दर निश्चित करणेत आलेले होते सदर १० (दहा) वर्षापासुन कुठल्याही प्रकारचे दर वाढ करणेत आलेली नाही. तरी महाराष्ट्र शासन राजपत्र दि.९ मे २०२२ चे सुचने मधील (२०) जाहिरात परवाना शुल्क ३(तीन) वर्षानंतर चलन वाढ दरांनुसार निश्चित करावी असे आदेशीत केलेले आहे.त्यानुसार तेच दर स.न २०२३ मध्ये जाहिरात परवाना शुल्क म्हणुन निश्चित करणेत आलेले होते.

महाराष्ट्र महानगरपालिका १९४९ चे कलम ४५६ अ च्या पोट कलम (१) यासह आणि कलम २४४, २४५ व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन धुळे महानगरपालिकेच्या क्षेत्रात व्यवसाय व बांधकाम मध्ये मोठया प्रमाणात होणारी वाढ व त्यानुसार जाहिरात क्षेत्रापासुन मिळणारे उत्पन्न विचारात घेता धुळे महानगरपालिकेस जाहिरात परवाना शुल्कात दर ३ (तीन) वर्षाने वाढीव सुधारणा करणे आवश्यक असल्यानुसार ठराव महासभा क्र.१ प्रशासक ठराव क्र.६ दि.२५/०१/२०२४ ने मान्यता देण्यात आलेली आहे.

नविन जाहिरात फलक परवानगी उभारणी करीता ३(२) (क) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कमल ७९ च्या आणि या नियमाच्या तरतुदीना अधिन राहुन महानगरपालिका निविदा मागवुन महानगरपालिका जमीनीवर पोटनियम (१) मध्ये नमुद केलेल्या विभिन्न स्वरुपातील जाहिरात प्रदर्शित करण्यासाठी परवाना देता येईल त्यासाठी जाहिर निविदा मागविणेआवश्यक आहे.

तरी शासनाने निश्चित केलेल्या साईज यामध्ये कुठलाही प्रकारे बदल करावायाचा नाही व विहित आकराहुन मोठया आकाराच्या जाहिरात फलकास परवानगी देण्यात येणार नाही.

नविन जाहिरात फलक परवानगी (घ) सार्वजनिक खुली जागा म्हणजे मनोरंजनाची मैदाने, क्रीडांगण, उद्याने बगिचे (छ) नदी पत्रात, तलावात, कॅनॉल, जलाशयात, नाल्या मध्ये कोणताही जाहिरात फलक लावण्याची परवानगी दिली जाणार नाही.

तसेच धुळे महानगरपलिकेचे असलेले दर व ईतर महानगरपालिकेचे दर लक्षात घेता धुळे महानगपालिका हद्दीत अस्तीत्वात आलेले होर्डिंग चे दर व वाढीस उपलब्ध असलेल्या खुली जागेवर होडिंग लावणेस मान्यता मिळाल्यास महानगरपालिकेच्या उत्पन्नात जास्तीचे जास्तीचे उत्पन्न मिळणार आहे.

तरी जागा निश्चित करुन त्यावर नविन होर्डिंग लावणेस मान्यता मिळवुन जुने दर व नविन प्राप्त दर समान करणेस मान्यता मिळवुन त्याकरीता ई-निविदा प्रसिध्द करणेस सदरचा विषय महासभे पुढे मान्यता मिळणे करीता सादर करण्यात आलेल्या असता धुळे महानगरपालिका प्रशासकीय महासभा ठराव क्र.१९६ दि.२९/०९/२०२५ ने ठरावास मान्यता मिळालेली आहे त्यानुसार इतर मनपा कडील दराचा तपास केला असता धुळे मनपा कडील दर हे अल्प असल्यामुळे मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे सुचनेनुसार खाली प्रमाणे दर निश्चित करणेत आलेले आहे.

| **अ.क्र.** | **कामाचे नांव** | **परिणाम** | **युनिट** | **मपाने निश्चित केलेले दर** | **एकुण रक्कम** |
|---|---|---|---|---|---|
| १. | जाहिरात परवाना शुल्क प्रति वर्ष | ४९००० | प्रति स्के.फुट | ४०.०० | १९,६०,०००/- |
| २. | मनपा जागा भाडे प्रति वर्ष | ७५ | Nos | ९००.०० | ६७,५००/- |
| ३. | संस्करण फी प्रति वर्ष | ७५ | Nos | ५००.०० | ३७,५००/- |
| ४. | नुतनीकरण प्रति वर्ष | ७५ | Nos | ५००.०० | ३७,५००/- |
| | | महानगरपलिकेने निश्चित केलेली रक्कम | | | २१,०२,५००/- |

तरी त्याप्रमाणे निविदा धारकास खालील प्रमाणे रक्कम भरणे बंधनकारक करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | तपशिल | रक्कम | कामाची मुदत |
|---|---|---|---|
| १ | Estimated Cost | २१,०२,५००/- | ५ (पाच) वर्ष |
| २ | Earnest Money १०% | २,१०,२५०/- | |
| ३ | Cost of Blank Tender Set | १,४७५/- | |

सदर जाहिरात फलकाच्या प्रमाण आकाराच्या होर्डींग वर २ (दोन) फुट उंची ची साईज जागा धुळे मनपा संदेश करीता राखीव ठेवणे आवश्यक असुन ते निविदाधारकास बंधनकारक राहिल.

तसेच नियम २०२२ ३ मधील (ख) विद्यमान करार किंवा ज्या दिनांकास हे नियम अमलात येतील त्या दिवासापासुन ५ वर्षाच्या कालावधीत अस्थित्वातील परवान्याबाबत ५ वर्ष कालवधी निश्चित करण्यात येत आहे.

तसेच मागील १० (दहा) वर्षापासुन दर वाढ न केलेल्या जुने अस्तीत्वात असलेले होडिंग चे दर व नविन उपलब्ध असलेल्या खुली जागेवर होडिंग लावणेस जाहिरात निविदा व्दारे प्राप्त झालेले जास्तीत जास्तचे दर समान करणे आवश्यक आहे. त्यानुसार सदरचा विषय जाहिरात फलक उभारणी प्रक्रीयेस व सुधारित दर करण्यासाठी प्रस्ताव महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, धुळे महानगरपालिका मालकीच्या खुली जागेत स्वखर्चाने जाहिरात फलक उभारणी करुन जाहिरातीसाठी वापरणे कामी वार्षिक जाहिरात परवाना शुल्क, जागा भाडे, लायन्स फी भरुन नविन होडिंग उभारणे यासाठी प्रस्तावात नमूद निश्चीत केलेल्या दरांना मान्यता देणेत येत आहे. तसेच याकामी खाजगी ठेकेदार नियुक्त करणेसाठी निविदा प्रक्रिया करणेस मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांकः-२२२ मौजे चितोड ता.जि.धुळे सर्व्हे.नं.१५/१,१५/२ मधील २४ मी रुंद विकास योजना रस्त्याखालील भागाचे भूसंपादन प्रक्रियेबाबत्त आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.कार्य. अभियंता हा विषय भुसंपादनासाठी कलेक्टर ऑफिसला पाठविण्याबाबतचा आहे. जमिन मालक श्री. ओमप्रकाश खंडेलवाल मौजे चितोड स.नं. १५/२ मध्ये यांचा लेआउट दि. १ मार्च २००९ अन्वये तत्कालीन नगररचनाकार यांनी मंजुर केला होता. त्या मंजुर लेआऊटमध्ये २४ मिटर रुंद रस्ता दर्शविण्यात आला होता. आणि तो जमिन मालक यांनी सबमिट करतांनाच दर्शविला होता. तसेच दुसरे जे मालक आहे. श्री. संजय शेंडे मौजे चितोड स.नं. १५/१ मध्ये यांचा लेआऊट यांनी दि. १ मार्च २००८ अन्वये नगररचनाकार यांच्या मार्फत मंजुरी घेतली आहे. त्यातही २४ मि. रुंदीचा रस्ता दर्शवुन लेआऊट मंजुर केला होता. याबाबत त्यांनी २४ मिटर रस्त्याचे भुसंपादन रक्कम आम्हाला मिळावे याबाबत मे. उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. याचिका क्र. ७४९६/२०१९ व ७४९१/२०१८ यात धुळे मनपाला पार्टी केली होती. मे. उच्च न्यायालायाचा निकाल मनपा विरुध्द गेला. यात ९ मिटर रस्ता त्यांना लेआऊट करतांनाच सोडावाच लागणार होता. २४ मिटर मधुन ९ मी. रस्ता वजा करुन १५ मी. रस्ता भुसंपादन सुरु करावे असा निकाल आहे. दोन्ही प्रकरणात सारखाच निकाल दिला आहे. उक्त प्रकरणी मनपाने याचिका दाखल केली होती. १४४९८/२०२१ व १४४९९/२०२१ यात मे. सुप्रिम कोर्टाचे म्हणणे आहे की उच्च न्यायालयाच्या निकालात हस्तक्षेप करणार नाही. तसेच जे जमिन मालक यांनी अवमान याचिका दाखल केली. अवमान याचिका क्र. ३५८/२०२५ व ३५६/२०२५ यासंदर्भात वकिलांचा अभिप्रायानुसार पुनरावलोकन याचिका दाखल केली. याचिका क्र. ५०५८०/२०२५ व ५०५७६/२०२५ तर ही पुनराविलोकन याचिका देखील मनपा विरुध्द गेली आहे. उक्त संदर्भात ॲडव्होकेट यांच्याशी चर्चा केल्यानुसार आपण तात्पुरता भुसंपादन प्रस्ताव मंजुर करुन कलेक्टर ऑफिस येथे पाठवुन याबाबत कार्यवाही सुरु करावी असे सांगितले. जो निकाल लागेल त्यानंतर पुढील कार्यवाही करु. त्यांचा जवळजवळ ४९८६ चौ.मि. एरिया होतो आहे. आणि आजचा रेडीरेकनर दर २६९०/- प्रति स्क्वेअर मिटर आहे. त्यानुसार १ कोटी ३४ लाख रुपये होत आहे आणि निकालात ३ पट गेले तर तो ४ कोटीच्या आसपास खर्च होणार आहे त्या रस्त्याचा.

मा.आयुक्त तथा प्रशासक कोर्ट मॅटरमध्ये त्यांनी पार्टी कोणा कोणाला केले होते.
मा.कार्य. अभियंता त्यांनी जिल्हाधिकारी, नगररचनाकार आणि मनपालाही केले होते.
मा.आयुक्त तथा प्रशासक कोर्टाच आदेश कोणाला झाले भुसंपादन करा म्हणुन
मा.कार्य. अभियंता तसे काही म्हटले नाही हे आपल्याकडे अजेंडयावरी आले २०१८ ला त्यात मनपाने भुसंपादन करावे असे म्हटलेनाही.
मा.आयुक्त तथा प्रशासक कोणी भुसंपादन करावे हे निश्चीत नसेल आपण अर्थ कसा काढला भुसंपादन महानगरपालिकेने करावे.
मा.कार्य अभियंता रस्ते आपल्याकडे हस्तांतरीत झाले आहे.
मा.आयुक्त तथा प्रशासक हस्तांतरीत झाल्याचा काय पुरावा आहे आपल्याकडे
मा.कार्य.अभियंता रस्त्यावर सरकार म्हणुन मालकी आहे. आणिओपनस्पेसवर अधिसुचनेनुसार २०१८ च्या हददवाढ झाली तेव्हापासुन
मा.आयुक्त तथा प्रशासक यात भुसंपादन प्रस्ताव पाठवा व तयात वस्तुस्थिती नमुद करावी की पुर्वी नगररचना विभागाने हा लेआऊट मंजुर केला होता. तेव्हा प्लॅनिंग ऑथोरिटी ते होते. आता हददवाढ झाल्यामुळे मनपा त्याचे नियोजन प्राधिकरण आले आहे. तर या प्रस्तावात भुसपांदन प्राधिकरण निश्चीत करुन मिळावे आणि भुसंपादन प्रकिया पुर्ण करावी.
मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक २२२ दिनांक १०/१२/२०२५**

श्री. ओमप्रकाश गोपालकृष्ण खंडेलवाल,धुळे यांनी मौजे चितोड ता.जि. धुळे येथील स.नं.१५/२ मधील मिळकती बाबत श्री. ओमप्रकाश गोपालकृष्ण खंडेलवाल यांचे मालकीचे असून त्यांना नगररचना आणि मुल्य निर्धारण विभाग शाखा धुळे या कार्यालयीन पत्र क्र. १५९ दि.१ मार्च २००९ अन्वये रहिवास प्रयोजनार्थ अभिन्यासास प्लॉट नं.१ ते ६२ यांना तत्कालीन मा.नगररचनाकार,धुळे यांच्यामार्फत मंजुरी घेतली होती. त्यात मौजे चितोड स.नं.१५/२ चे एकूण क्षेत्रफळ २५,९०० चौ.मी. असून त्यात खुल्या जागेचे क्षेत्रफळ २६२५.८७ चौ.मी. एवढे आहे. एकूण भूखंडाचे क्षेत्रफळ १५,५३१.२८ चौ.मी.आहे.तसेच रस्त्याचे क्षेत्रफळ ७७४२.८७ चौ.मी. आहे. त्यापैकी २४.०० मी रुंद विकास योजना रस्त्याचे क्षेत्र २८३२.०० चौ.मी आहे.

२. श्री. संजय विष्णू शेंडे,धुळे यांनी मौजे चितोड ता.जि. धुळे येथील स.नं.१५/१ मधील मिळकती बाबत श्री. संजय विष्णू शेंडे यांचे मालकीचे असून त्यांना नगररचना आणि मुल्य निर्धारण विभाग शाखा धुळे या कार्यालयीन पत्र क्र. १५८ दि.१ मार्च २००८ अन्वये रहिवास प्रयोजनार्थ अभिन्यासास प्लॉट नं. १ ते ६७ यांना तत्कालीन मा.नगररचनाकार,धुळे यांच्यामार्फत मंजुरी घेतली होती. त्यात मौजे चितोड स.नं.१५/१ चे एकूण क्षेत्रफळ २९,१०० चौ.मी. असून त्यात खुल्या जागेचे क्षेत्रफळ २९२९.३४ चौ.मी. एवढे आहे. एकूण भूखंडाचे क्षेत्रफळ १६,७६४.०४ चौ.मी.आहे.तसेच रस्त्याचे क्षेत्रफळ ९४०६.६२ चौ.मी. आहे. त्यापैकी २४.०० मी रुंद विकास योजना रस्त्याचे क्षेत्र २१५४.०० चौ.मी आहे.

३. उक्त प्रकरणी दोघेही जमीन मालक यांनी अनुक्रमे मा.उच्च न्यायालय याचिका क्र.७४९६/२०१८ व ७४९१/२०१८ अन्वये मा.उच्च न्यायालयात २४.०० मी.रुंद रस्त्याचे क्षेत्रफळ भूसंपादन साठी याचिका दाखल केली आहे.उक्त दोन्ही याचिका संदर्भात धुळे महानगरपालिकेतर्फे ॲड.श्री.अमोल सावंत मा.उच्च न्यायालय औरंगाबाद यांनी बाजू मांडली होती.

४. तथापि उक्त याचिका क्र.७४९६/२०१८ प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दि.११/१०/२०१९ रोजी खालीलप्रमाणे आदेश पारित केला आहे.

The respondents shall initiate acquisition proceedings for the area of the land afected in the development plan road as per the layout sanctioned to the petitioners in the year २००८of land gut No. १५/२situated at village Chittod, Tq. and Dist. Dhule, after deducting the area that the petitioners would have required to provide for ०९meter wide road. The valuation of the said area would beconsidered as on the date of sanction of the layout. The acquisition proceedings shall be initiated within a period of three (०३) months from the date of this order and shall be completed within the period as contemplated under the provisions of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, २०१३. The petitioners would not be entitled for any rental compensation or any interest for the period

the land was taken in possession by the respondents/State and the fling of the petition.

५. तसेच याचिका क्र.७४९१/२०१८ प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दि.११/१०/२०१९ रोजी खालीलप्रमाणे आदेश पारित केला आहे.

The respondents shall initiate acquisition proceedings for the area of the land afected in the development plan road as per the layout sanctioned to the petitioners in the year २००८of land gut No. १५/१situated at village Chittod, Tq. and Dist. Dhule, after deducting the area that the petitioners would have required to provide for ०९meter wide road. The valuation of the said area would beconsidered as on the date of sanction of the layout. The acquisition proceedings shall be initiated within a period of three (०३) months from the date of this order and shall be completed within the period as contemplated under the provisions of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, २०१३. The petitioners would not be entitled for any rental compensation or any interest for the period the land was taken in possession by the respondents/State and the fling of the petition.

६. उक्त प्रकरणी मा.उच्च न्यायालयाच्या आदेशा विरुद्ध मा.सर्वोच्च न्यायालय,दिल्ली येथे याचिका क्र.१४४९८/२०२१ व १४४९९/२०२१ अनुक्रमे महानगरपालिकेने याचिका दाखल केली होती.सदर प्रकरणी ॲड.श्री.सुहासकुमार कदम मा. सर्वोच्च न्यायालय दिल्ली यांनी महानगरपालिकेच्या वतीने बाजू मांडली होती.

७. उक्त दोन्ही याचिका संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालय,दिल्ली यांनी दि.०२/०९/२०२४ रोजी खालीलप्रमाणे निकाल दिलेला आहे.

“ We are not inclined to interfere with the impugned order passed by the high court accordingly, the special leave petition are dismissed सर्वोच न्यायालयाने निर्णय पारित केला आहे.

८. सदर आदेशाची अंमलबजावणी केली नाही म्हणून श्री.खंडेलवाल व श्री. शेंडे यांनी धुळे मनपा विरुद्ध मा.ना.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे विषयांकीत क्रमांकाने अनुक्रमे अवमान याचिका क्र.३५८/२०२५ व ३५६/२०२५ दाखल केली आहे. उक्त दोन्ही याचिका संदर्भात धुळे महानगरपालिकेतर्फे ॲड.श्री.अमोल सावंत मा.उच्च न्यायालय औरंगाबाद हे बाजू मांडत आहे.

९. उक्त संदर्भात तत्कालीन आयुक्त यांनी मा.सर्वोच्च न्यायालय दिल्ली यांनी दिलेल्या आदेशा विरुद्ध पुन:श्य मा.सर्वोच्च न्यायालय दिल्ली येथे पुनरावलोकन याचिका दाखल करणे संदर्भात आदेशित केले होते.त्यानुसार ॲड.श्री.सुहासकुमार कदम यांच्यामार्फत पुनरावलोकन याचिका क्र.५०५८०/२०२५ व ५०५७६/२०२५ अन्वये मा.सर्वोच्च न्यायालय दिल्ली येथे पुनरावलोकन याचिका दाखल करण्यात आली आहे.तथापि उक्त संदर्भात अद्यापपावेतो स्थगन आदेश प्राप्त झालेला नाही.तसेच याचिका सुनावणीस आहे.

१०. उक्त संदर्भात जमीन मालक यांनी दाखल केलेल्या अवमान याचिका संदर्भात दि.२४/११/२०२५ रोजी मा.उच्च न्यायालय,औरंगाबाद येथे सुनावणी होती.उक्त संदर्भात पुढील तारिख २ आठवड्यांनी ठेवण्यात आलेली आहे.

११. उक्त संदर्भात ॲड.श्री.अमोल सावंत मा.उच्च न्यायालय औरंगाबाद यांनी दि.२६/११/२०२५ रोजी दिलेल्या निर्देशानुसार व समक्ष दूरध्वनी वर झालेल्या चर्चेनुसार मनपामार्फत मा.सर्वोच्च न्यायालय,दिल्ली येथे पुनरावलोकन याचिका क्र.५०५८०/२०२५ व ५०५७६/२०२५ सुरु आहेत.तथापि उक्त प्रकरणी मा. मा.सर्वोच्च न्यायालय,दिल्ली यांनी स्थगन आदेश दिलेला नाही व सदरचा दावा अद्यापपावेतो सुनावणीस आहे.तथापि जमीन मालक यांच्यातर्फे मा.उच्च न्यायालय,औरंगाबाद येथे अवमान याचिका दाखल असल्याने दि.११/१०/२०१९ रोजी मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार भूसंपादन प्रक्रिया सुरु करणे आवश्यक आहे.तथापि मा.सर्वोच्च न्यायालयाच्या पुढील सुनावणीच्या निर्देशानुसार आपणास योग्य ती कार्यवाही प्रस्तावित करता येईल त्यामुळे सध्यस्थितीत भूसंपादन प्रक्रिया सुरु करणे गरजेचे आहे असे सूचित केले आहे.

१२. उक्त प्रकरणी यापूर्वी धुळे महानगरपालिका प्रशासकीय महासभा ठराव क्र.१३७ दि.२१/०३/२०२५ अन्वये खालील प्रमाणे ठराव निर्णय पारित करण्यात आला आहे.

१.सदर अभिन्यास मान्यता मनपा हद्दवाढ होणेपुर्वी शासनाने दिलेली आहे.त्यामुळे मे.उच्च न्यालयाच्या निर्णयानुसार भूसंपादनाचा मोबदला देण्याची जबाबदारी तत्कालीन नियोजन प्राधिकरण म्हणून शासनाची असल्याने याबाबत शासनास कळविण्यात यावे.

२.अधिनियमातील तरतुदी व सध्यास्थितीनुसार सदर अभिन्यास मान्यता रद्द करता येईल किंवा कसे याबाबत नगररचना विभाग, या कार्यालयानी पडताळणी करावी.

३. तसेच सद्यस्थिती मनपाची आर्थिक स्थिती लक्षात घेता सदर भूसंपादनाचा आर्थिक मोबदला देण्यास मनपा असमर्थ आहे.त्यामुळे याप्रकरणी पुर्नविलोकन याचिका दाखल करावी किवा कसे याबाबत संबधित विधीतज्ञाचा कायदेशीर अभिप्राय घेवून पुढील उचित कायदेशीर कार्यवाही व प्रक्रिया करणेस मान्यता देनेत येत आहे, याप्रमाणे ठराव पारित झाला आहे.

१३. तरी उक्त प्रकरणी अॅड.श्री.अमोल सावंत यांच्या सुचनेनुसार सध्यस्थितीत सदर प्रकरणी भूसंपादन प्रक्रिया सुरु करावी किंवा कसे? सदर विषय धोरणात्मक निर्णय घेणेकामी मे. महासभेपुढे प्रस्ताव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, मे. सर्वोच्च न्यायालय व मे. उच्च न्यायालयाचे विषयांकित निकाल लक्षात घेता मौजे चितोड ता.जि.धुळे सर्व्हे.नं.१५/१,१५/२ मधील २४ मी रुंद विकास योजना रस्त्याखालील भागाचे भूसंपादन करणेस मान्यता देणत येत आहे.

तसेच भुसंपादन प्रस्ताव सादर करतांना संपुर्ण वस्तुस्थिती नमुद करुन प्रस्ताव सादर करावा. तसेच भुसंपादन प्राधीकरण निश्चीत करणेकामी मा. जिल्हाधिकारी कार्यालयाकडेस विचारणा करावी व तदनंतर भुसंपादन प्रस्ताव सादर करावा.वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-२२३ जिल्हा नगरोत्थान २०२५-२६ अंर्तगत कामाचे (अंदाजपत्रक) प्रस्ताव पाठविणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता आपण शासन निधीचे जे काही प्रस्ताव होते ते यापुर्वी पाठवलेले होते. त्यानंतर प्रभाग क्र. १८ चे माजी नगरसेवक यांच्या निवेदनावरुन मा. पालकमंत्री महोदय यांनी रिमार्क केल्यानुसार आपण जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव पाठविला होता.जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन आलेल्या सुचनांप्रमाणे मे. महासभेची मान्यता आवश्यक असल्यामुळे सदरचा विषय मे. महासभेपुढे सादर केला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक ठराव करुन पाठवावा. सदर प्रस्तावास मान्यता देणत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक २२३ दिनांक १०/१२/२०२५**

जिल्हा नगरोत्थान २०२५-२६ अंर्तगत मा.ना.श्री.जयकुमार रावल सो,पालकमंत्री धुळे यांनी खालील कामाचे प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी सो,धुळे यांचेकडेस सादर करणेबाबत सूचना दिलेल्या आहेत. त्याबाबतचा सदर प्रस्तावित काम खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| 1. उक्त | धुळे शहरातील प्रभाग क्र.18 मधील मोहाडी गावात विविध चौकात एलईडी हायमास्ट बसविणे. | रु.१४,९८,२९२/- |

प्रमाणे प्रस्तावित कामाचे सोबतप्रमाणे अंदाजपत्रक शासन दरसूची सार्वजनिक बांधकाम /विद्युत विभाग /२०२३-२४ च्या दरसुचीप्रमाणे सादर आहेत. सदर कामाचा परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा नगरोत्थान २०२५-२६अंर्तगत समाविष्ट करणेसाठी म.जिल्हाधिकारी सो,धुळे यांचेकडेस मान्यतेसाठी पाठविण्यासाठी, सदर विषय मे. महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, जिल्हा नगरोत्थान २०२५-२६ अंर्तगत कामाचे (अंदाजपत्रक) प्रस्ताव पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच मा.ना.श्री.जयकुमार रावल सो,पालकमंत्री धुळे यांचे पत्रानुसार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेअंतर्गत धुळे मनपा हददीतील कृषीनगर गृहनिर्माण सोसायटी, धुळे येथील प्लॉट नं. ११६ व १३० समोरील नगरभुमापन क्रमांक ५३९७ मधील ९४३ चौ.मि. जागेवर धम्मकेंद्र बांधणेकामी मान्यतेसाठी प्रस्ताव शासनाकडेस सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-२२४ धुळे मनपा गट नं.३ येथील ८० फुटी रोडवरील सावता माळी मार्केट विकसीत करणेकामी सदर बांधकाम निष्कासित करणेसाठी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.कार्य. अभियंता धुळे मनपा हददीतील ८० फुटीरोड लगत शाहु महाराज नाटय मंदिरासमोरील जागेत अस्तित्वातील श्री संत सावता माळी मार्केट असुन त्यात २९ गाळेपैकी ६ ते ८ गाळे (दुकाने) व ओटे सद्यस्थितीत सुरु असुन उर्वरीत गाळे हे पडक्या अवस्थेत आहे. तसेच ते ४० ते ५० वर्षापुर्वीचे बांधकाम आहे. आर्किटेक्ट नेमुन मे. स्थायी समिती ठराव क्र.३१४ दि.२६/१२/२०२४ जीर्ण झालेले बांधकाम पाडणेकामी तत्वत: मान्यता देण्यात आलेली आहे. तत्पुर्वी स्ट्रक्चरल इंजिनीयर यांनी ऑडीट रिपोर्ट सादर केला होता. त्यानुसार आता आपण त्या ठिकाणी १० कोटी शासनाने मंजुर केले आहे. मा.आमदार महोदय यांच्या प्रयत्नातुन त्याची ई निविदा प्रक्रिया करुन ठेकेदार श्री. मिलींद मुडावदकर यांना कार्यादेश दिला आहे. तेथील गाळे पाडुन जागा मोकळी करुन बांधकाम करावयाचे आहे. निष्कासित करणेकामी परवानगीस्तव विषय मे. महासभेपुढे सादर केला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक यात जागेची अती तातडीची मोजणी करुन घ्यावी फी भरुन मोजणी नकाशा घ्यावा. या इमारतीत किती शॉप निघणार आहे.

मा.कार्य. अभियंता ग्राऊंड फलोअरला ४६ शॉप निघणार आहे. तसेच फर्स्ट फलोअरला ४६ असे जवळपास १०० शॉप आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक इमारतीचे काम सुरु झाले की ई ऑक्शनची प्रक्रिया सोबतच सुरु करावी. जे सद्यस्थितीत भाडेकरुन आहे त्यांचे मागील ठरलेल्या धोरणाप्रमाणे प्राधान्य त्यांना द्यावे टाऊन प्लॅनिंगचे ॲप्रुव्ह घ्यावे नकाशांना.

मा.सहा.अभियंता (नर) नकाशा व बांधकाम उतारा जीर्ण झाला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक दोन्ही गोष्टींचा कंप्लायन्स करुन घ्या. तसेच तेथे एक स्वच्छतागृह आहे ते बिल्डींग प्लॅनमध्ये कुठे येतय.

मा.कार्य. अभियंता हो एक जुने आणि नविनच बांधले आहे. आत ५ ते ६ महिन्यापुर्वी जुने आहे ते वापरात नाही.

मा.आयुक्त तथा प्रशासक नगररचनेकडुन नकाशे मंजुर करुन घ्यावे. आणि मालकी हक्क काटेकोरपणे तपासले पाहिजे. आणि बांधकाम विभागाच्या विचारात ज्या काही जागा असतील बांधायच्या त्याची मोजणी आधीपासुन करुन घ्यावी. स्वच्छता गृहाची स्ट्रक्चरल स्टॅबिलीटी करावी. तयात ते धोकादायक आढळले तर तेही निष्कासित करावे लागेल तुम्हाला नाहीतर बिल्डींगमध्ये शिफट करावे लागेल.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक २२४ दिनांक १०/१२/२०२५**

धुळे मनपा हद्दीतील ८० फुटी रोड लगत शाहू महाराज नाट्य मंदिर समोरील जागेत श्री अस्तीवातील श्री संत सावता माळी मार्केट असून ते जवळपास ४० ते ५० वर्षापुर्वी मार्केटचे बांधकाम झाले असून त्यात एकूण २९ गाळे पैकी ६ ते ८ गाळे (दुकाने) व ओटे सद्यस्थितीत सुरु असून उर्वरित गाळे हे पडक्या अवस्थेत असल्याचे निर्देशनास आले आहे. सदर मार्केट बांधणे बाबत आर्किटेक नेमणूक कामी मे स्थायी समिती ठराव क्र ३१४ दि २६/१२/२०२४ अन्वये पारित करण्यात आला असून सदरचे बांधकाम जीर्ण झाले असल्याने बांधकाम पाडणे कामी तत्वत: मान्यता देण्यात आलेली आहे.

स्ट्रक्चरल इंजिनीअर यांनी सावता माळी मार्केटचा दि १३/०५/२०२५ रोजीच्या स्ट्रक्चरल ऑडीट रीपोर्ट सादर केला असून त्यात The Building at the Present Sitution

is not fit for any occupancy or any use and is to be dismantle असे नमूद केले आहे .धुळे शहराचे आमदार श्री. अनुपभैय्या अग्रवाल प्रयत्नाने महाराष्ट्र शासन नियोजन विभाग यांचे शासन निर्णयानुसार दि १४ ऑक्टोबर २०२४ अन्वये धुळे शहरात महिलांना उदद्योगासाठी धुळे मनपा गट नं.३, ८० फुटी रोड वरील सावता माळी मार्केट विकसित करण्याचे काम मंजूर झाले असून त्यास रु.१० कोटी इतका निधी मंजूर असून त्याकामची ई निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असून त्या कामाची ई निविदा सूचना क्र १०८/२०२४ _DMCD_११०९४९५_३६ अन्वये त्यास सर्वात कमी दरठेकेदार श्री मिलिंद मुडावदकर यांचा असून त्यांना कार्यादेश क्र. जा.क्र /बांध. वि./१९६/२०२५दि २७/१०/२०२५ अन्वये कार्यादेश देण्यात आलेला आहे.

स्ट्रक्चरल इंजिनीअर यांच्या स्ट्रक्चरल ऑडीट नुसार धुळे मनपा गट नं. ३, ८० फुटी रोड वरील सावता माळी मार्केटचे बांधकाम जिर्ण झाले असल्याने सदरचे बांधकाम निष्कासित करणे आवश्यक असल्याने सदरचा निर्णय घेणेसाठी पुढील यथोचित आदेशार्थ मे.महासभा पुढे विषय सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, धुळे मनपा गट नं.३ येथील ८० फुटी रोडवरील सावता माळी मार्केट विकसीत करणेकामी सदर बांधकाम निष्कासित करणेसाठी मान्यता देणेत येत आहे.

सदर जागेची नगरभुमापन विभागामार्फत अतितातडीची मोजणी करावी व बांधकाम आराखडयांना नगररचना विभागाची मान्यता घ्यावी तसेच सदर बांधकाम सुरु झाल्यावर दुकाने वितरीत करण्यासाठी ई ऑक्शन प्रक्रिया सुरु करावी. तसेच सदर ठिकाणी असलेले सार्वजनिक शौचालयाच्या बांधकामाची संरचनात्मक क्षमता (स्ट्रक्चरल स्टॅबीलिटी) तपासण्यात यावी. व हे शौचालय आवश्यकतेनुसार निष्कासित करुन प्रस्तावित नूतन इमारतीत स्थलांतरीत करण्यात यावे. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-२२५ भटक्या जनावरांमुळे मानवाच्या दैनंदिन जीवनात होणारा उपद्रव तसेच उपाययोजना करणे साठी शेल्टर हाऊस बांधणे कामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.कार्य. अभियंता शासन निर्णयानुसार भटक्या जनावरांमुळे दैनंदिन जीवनात होणारा उपद्रव टाळण्यासाठी उपाययोजना करणेसाठी भटक्या श्वानांना पकडुन त्यांना कायमस्वरुपी शेल्टर हाऊसमध्ये ठेवणेबाबत निर्देशीत केले आहे. त्यानुसार १००० भटक्या श्वानांसाठी शेल्टर हाऊस बांधणेकामी अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. त्यासाठी २८०० चौ.मि. जागेची आवश्यकता आहे. त्यासाठी ७० बाय ४० मीटर बांधकाम करुन २ कोटी रुपये खर्च अपेक्षीत आहे. त्यासाठी अवधान स.नं. ६२/१ येथे निश्चीत केले आहे. मोजणी करुन घेतली सिटी सर्व्हेकडुन तेथे सोलर प्लांट प्रपोज आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक जागा मालकी तपासून नकाशांना प्राथमिक मंजुरी घ्यावी. निधी कुठुन उपलब्ध होईल.

मा.कार्य. अभियंता शासनाकडे निधीची मागणी किंवा नियोजन ऑफिस किंवा मनपा फंड

मा.आयुक्त तथा प्रशासक जिल्हा नियोजन समिती किंवा शासनाकडे मागणी करावी. वैशिष्टपुर्ण किंवा नाविण्यपुर्ण निधी प्रेफरन्स करावा. कलेक्टर स्तरावर डीपीडीसीमध्ये समजा निधी नाही मिळाला तर मनपा फंडात प्रोव्हिजन करुन त्याला पुर्ण करावे लागेल. हे रिव्हाईज बजेटमध्ये घ्यावे. मनपाच्या आकृतीबंधात पशुवैद्यकीय अधिकारींची पदे आहेत का.

कार्यालयीन अधिक्षक हो पदे आहेत.

मा.आयुक्त तथा प्रशासक यासाठी पशुवैद्यकीय चा स्टाफ देखील लागणार आहे आणि सुप्रिम कोर्टने सांगीतले की, पशुवैकीय दवाखाना मनपाने सुरु करावा. आपण दवाखान्याची प्रोव्हिजन केली आहे का.

मा.कार्य. अभियंता हो व्हॅक्सीनेशन रुम आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक ही पदे भरण्यासाठी कंत्राटी पध्दतीने जाहिरात काढावी किंवा त्रयस्थ एजन्सी असेल जी ते पदे पुरविण्याची काम करेल. कंत्राटी पदांचा किमान वेतन कायद्यानुसार ती एजन्सी नेमण्याची कार्यवाही करावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक २२५ दिनांक १०/१२/२०२५**

शासन निर्णयानुसार भटक्या जनावरांमुळे मानवाच्या दैनंदिन जीवनात होणारा उपद्रव तसेच मानव श्वान संघर्ष टाळण्यासाठी उपाययोजना करणे साठी भटक्या श्वानांना पकडून त्यांना कायम स्वरूपी शेल्टर हाऊस मध्ये ठेवणे बाबत निर्देशित केले आहे.

तसेच भारतीय जीवजंतू कल्याण बोर्ड, भारत सरकार यांनी भटक्या श्वानांना पकडून त्यांना कायम स्वरूपी शेल्टर हाऊस मध्ये ठेवणे बाबत Standard Operating Procedure (SOP) नुसार मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत.

उक्त कामी भारतीय जीवजंतू कल्याण बोर्ड, भारत सरकार यांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचने नुसार १००० भटक्या श्वानांसाठी शेल्टर हाऊस बांधणे करिता अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर कामास रक्कम रु.२,८९,८९,८१८/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च हा शासन निधी अथवा जिल्हा नियोजन विभागाकडील निधी अथवा मनपा निधी अंतर्गत करण्यात येणार आहे. सदर कामासाठी एकूण ७० मी x ४० मी = २,८०० चौ.मी. जागेची आवश्यकता आहे.

यानुषांगाने अवधान सर्व्हे नं. ६२/१ येथे मनपा मालकीची जागा उपलब्ध असून सदर ठिकाणी उक्त कामासाठी जागा निश्चिती करणे कामी नगररचना विभागाचा अभिप्राय घेऊन धोरणात्मक निर्णयासाठी सदरचा विषय मे.महासभेपुढे प्रस्ताव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, भटक्या जनावरांमुळे मानवाच्या दैनंदिन जीवनात होणारा उपद्रव तसेच उपाययोजना करणे साठी शेल्टर हाऊस बांधणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच सदर कामी येणाऱ्या खर्चाबाबत अनुदान मागणी प्रस्ताव वैशिष्टपुर्ण / नाविण्यपुर्ण योजनेतुन सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशान ही कार्यवाही करणे बंधनकारक असल्याने शासनाकडून/ डी.पी.डी.सी. मधून निधी न मिळाल्यास महानगरपालिका निधीतून ही कार्यवाही करण्यात यावी.

तसेच जागा मालकी तपासुन सदर ठिकाणी उभारण्यात येणाऱ्या बांधकाम आराखडयांना नगररचना विभागाकडुन मान्यता घ्यावी. सदर ठिकाणी पशुवैद्यकीय दवाखाना प्रस्तावित करुन मनपा आकृतीबंधानुसार पशुवैद्यकीय अधिकारी पद मानधनावर / कंत्राटी पध्दतीने भरणेबाबत कार्यवाही करण्याची दक्षता विभागाने घ्यावी. या प्रस्तावाबाबत अंदाजपत्रकीय तरतुद विभागाने प्रस्तावीत करावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-२२६ देवपूर भागांतील नवरंग पाण्याच्या टाकीजवळ प्रस्तावित असलेल्या व्यापारी संकुलास जयहिंद सिटी मॉल नामकरण देणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता देवपुर भागातील नवरंग पाण्याच्या टाकीजवळ प्रस्तावित असलेल्या मॉलला जयहिंद सिटी मॉल असे नामकरण करणेबाबत मा. आमदार श्री. अनुपजी अग्रवाल यांनी पत्राव्दारे मागणी केली आहे. उक्त कामी वर्तमानपत्रात ७ दिवसांची जाहिरात दिली होती. त्या ७ दिवसाच्या कालावधीमध्ये ४ हरकती सुचना प्राप्त झाल्या आहे. त्यात अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मुलन संघर्ष समिती, संभाजी ब्रिगेड,ताराराणी महिला ज्येष्ठ नागरीक संघ, धुळे जिल्हा जिजाऊ ब्रिगेड अशा ४ संस्थांनी हरकत दिल्या होत्या त्यांनी याबाबत सुचित केले की या मॉलला राजमाता जिजाऊ सिटी मॉल असे नामकरण करण्यात यावे असे सुचित केले आहे. यास्तव सदरचा विषय मे. महासभेपुढे सादर केलेला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक विभागाचे काय मत आहे.

मा.उपअभियंता सदर हरकती फेटाळुन तसेच जिजाऊ माता यांचे नाव इतर ठिकाणी देण्यात आले आहे. त्यामुळे प्रस्तावित असलेल्या मॉलला जयहिंद सिटी मॉल नामकरण करणे योग्य राहिल असे विभागाचे मत आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक — सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक २२६ दिनांक १०/१२/२०२५**

देवपूर भागांतील नवरंग पाण्याच्या टाकीजवळ प्रस्तावित असलेल्या मॉलला जयहिंद सिटी मॉल असे नामकरण करणे बाबत मा आमदार.श्री. अनुप (भैय्या) ओमप्रकाश अग्रवाल यांनी उपरोक्त संदर्भानुसार मागणी केली आहे.

नामकरणाचे प्रस्ताव सादर करतांना खालील बाबीची दक्षता घेणेबाबत जा.क्रं. धुमपा / आस्थापना/537 दि.4/8/2021अन्वये शहरातील विविध रस्ते, उद्यान इ.करिता स्थानिक नागरीकांचे नामकरणासाठीचे प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करतांना संबंधित शासनाचे निर्णय परिपत्रकात नमूद केलेल्या अटी शर्तीनुसार नामकरणाचे प्रस्ताव सादर करतांना खात्री करुन झाल्यानंतरच प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्याबाबत मा. आयुक्त सो. यांनी आदेशित केले आहे.

या संदर्भात महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रं. संकिर्ण १०/ प्र.क्र.१३४/२००२/पं.रास.१ मंत्रालय मुंबई दि.७ जून २००२ चे परिपत्रकान्वये शासना कडील मंजूर निधीतून जिल्हा / तालुका / ग्राम पातळीवर करण्यांत येणाऱ्या विकास कामातंर्गत बांधण्यांत येणारे धरणे, पुल, रस्ते इमारती यांना शासनाच्या मान्यतेशिवाय कोणत्याही नेत्यांचे नांव देण्यांत येवू नये असे ही आदेशित करण्यांत येत आहे असे नमूद आहे.

सदरचा विषय मनपा अधिनियम १९४९ मधील अनुसुची ड नुसार प्रकरण ११ मधील रस्ते या प्रकरणातील २ (१) मध्ये (अ) (ब) (क) (ड) नुसार स्पष्टीकरण करण्यात आले आहे.

तसेच या संदर्भात महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक:संकीर्ण-२०२०/प्र.क्र.३३/अजाक मंत्रालय मुंबई दि.११डिसेंबर २०२० चा शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्यातील गावांची वस्त्यांची व रस्त्यांची जातीवाचक नावे बदलून अशा जातीवाचक नावांऐवजी महापुरुषांची व लोकशाही मुल्यांशी निगडित नांवे देण्यास मान्यता देण्यात येत आहे असे नमुद आहे.

उक्त बाबत सदर मॉलचे काम प्रस्तावित असून अद्यापपावेतो सदर मॉलचे नामकरण झालेले नाही.

उक्त बाबत नागरिकांकडून ७ दिवसाच्या आत हरकती व सुचना मागविण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार एकूण ४ संस्थांच्या हरकती प्राप्त झाल्या आहेत. सदर हरकतींमध्ये सदर मॉलला 'राजमाता जिजाऊ सिटी मॉल' असे नामकरण करण्यात यावे अशी हरकत नोंदविण्यात आली आहे .धोरणात्मक निर्णयासाठी प्रस्ताव मे.महासभे पुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, देवपूर भागांतील नवरंग पाण्याच्या टाकीजवळ प्रस्तावित असलेल्या व्यापारी संकुलास जयहिंद सिटी मॉल नामकरण करणेस विभागाच्या अभिप्रायानुसार मान्यता देणेत येत आहे. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-२२७ — देवपूर भागांतील नवरंग पाण्याच्या टाकीजवळ प्रस्तावित असलेल्या भाजी मंडईला सरकार महर्षी दादासाहेब रावल भाजी मंडई असे नामकरण देणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता — देवपूर भागातील नवरंग पाण्याच्या टाकीजवळ प्रस्तावित असलेल्या भाजी मंडईला सहकार महर्षी दादासाहेब रावल भाजी मंडई असे नामकरण करणेबाबत मा. आमदार श्री. अनुपभैय्या अग्रवाल यांनी पत्राव्दारे सुचविले आहे. उक्त कामी वर्तमानपत्रात ७ दिवसांची जाहिरात देवुन हरकत व सुचना मागविल्या होत्या यात सुध्दा मागील विषयाप्रमाणे ४ संस्थांनी हरकती व सुचना मांडलेल्या आहेत. त्यांच्या पत्रानुसार भाजी मंडईसाठी धुळे नगरपालिकेचे प्रथम नगराध्यक्ष डॉ. रा. भ. चौधरी भाजी मंडई असे नामकरण सुचविले आहे. याबाबत विभागाचे मत असे की, डॉ. रा.भ. चौधरी यांचे नामकरण इतर ठिकाणी देण्यात आलेले आहे. त्यामुळे या

हरकती सुचना फेटाळुन भाजी मंडईला सहकार महर्षी दादासाहेब रावल असे नाव देण्याबाबत या कार्यालयाचे मत आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक २२७ दिनांक १०/१२/२०२५**

देवपूर भागांतील नवरंग पाण्याच्या टाकीजवळ प्रस्तावित असलेल्या भाजी मंडईला सरकार महर्षी दादासाहेब रावल भाजी मंडई असे नामकरण करणे बाबत मा आमदार.श्री. अनुप (भैय्या) ओमप्रकाश अग्रवाल यांनी उपरोक्त संदर्भानुसार मागणी केली आहे.

नामकरणाचे प्रस्ताव सादर करतांना खालील बाबींची दक्षता घेणेबाबत जा.क्रं. धुमपा/आस्थापना/५३७ दि.४/८/२०२१अन्वये शहरातील विविध रस्ते, उद्यान इ.करिता स्थानिक नागरीकांचे नामकरणासाठीचे प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करतांना संबंधित शासनाचे निर्णय परिपत्रकात नमूद केलेल्या अटी शर्तीनुसार नामकरणाचे प्रस्ताव सादर करतांना खात्री करुन झाल्यानंतरच प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्याबाबत मा. आयुक्त सो. यांनी आदेशित केले आहे.

या संदर्भात महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रं. संकिर्ण १०/ प्र.क्र.१३४/२००२/पं.रास.१ मंत्रालय मुंबई दि. ७ जून २००२ चे परिपत्रकान्वये शासना कडील मंजूर निधीतून जिल्हा / तालुका / ग्राम पातळीवर करण्यांत येणाऱ्या विकास कामातंर्गत बांधण्यांत येणारे धरणे, पुल, रस्ते इमारती यांना शासनाच्या मान्यतेशिवाय कोणत्याही नेत्यांचे नांव देण्यांत येवू नये असे ही आदेशित करण्यांत येत आहे असे नमूद आहे.

सदरचा विषय मनपा अधिनियम १९४९ मधील अनुसुची ड नुसार प्रकरण ११ मधील रस्ते या प्रकरणातील २ (१) मध्ये (अ) (ब) (क) (ड) नुसार स्पष्टीकरण करण्यात आले आहे.

तसेच या संदर्भात महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक:संकीर्ण-२०२०/प्र.क्र.३३/अजाक मंत्रालय मुंबई दि.११डिसेंबर २०२० चा शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्यातील गावांची वस्त्यांची व रस्त्यांची जातीवाचक नावे बदलून अशा जातीवाचक नावांऐवजी महापुरुषांची व लोकशाही मुल्यांशी निगडित नांवे देण्यास मान्यता देण्यात येत आहे असे नमुद आहे.

भाजी मंडईचे काम प्रस्तावित असून अद्यापपावेतो सदर भाजी मंडईचे नामकरण झालेले नाही उक्त बाबत नागरिकांकडून ७ दिवसाच्या आत हरकती व सुचना मागविण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार एकूण ४ संस्थांच्या हरकती प्राप्त झाल्या आहेत. सदर हरकतींमध्ये सदर मॉलला प्रथम नगराध्यक्ष "डॉ. रा.भ चौधरी " असे नामकरण करण्यात यावे अशी हरकत नोंदविण्यात आली आहे.

उक्त बाबत सदरचा विषय धोरणात्मक निर्णयासाठी मे. महासभेपुढे सादर झालेला आहे. उक्त कार्यालयीन अहवालानुसार देवपूर भागांतील नवरंग पाण्याच्या टाकीजवळ प्रस्तावित असलेल्या भाजी मंडईला सहकार महर्षी दादासाहेब रावल भाजी मंडई असे नामकरण करणेस विभागाच्या अभिप्रायानुसार मान्यता देणेत येत आहे. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-२२८ प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० अंतर्गत Affordable Housing Project (AHP) या घटका अंतर्गत शासनास प्रस्ताव सादर करणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.कार्य. अभियंता शासन निर्णयानुसार प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० अंतर्गत सदरचा विषय मंजुरीस्तव सादर केला आहे. यात ज्या लोकांकडे ७/१२ उतारे नाहित किंवा स्वमालकीचे घर नाही. त्यांच्यासाठी हा विषय आहे. त्यासाठी शासन २.५ लाख रुपयापर्यंत अनुदान उपलब्ध करुन देणार आहे. तसेच उर्वरीत खर्च हा लाभार्थ्यांना करावयाचा आहे. याकामी जागा निश्चीती व मान्यतेस्तव विषय सादर झालेला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक जागा निश्चीती केली आहे का.

मा.कार्य. अभियंता पुर्वीचे धुळे शहर विकास आराखडा आहे. त्यात एकुण ९ जागा होत्या. त्यात हौसिंग फॉर अर्बन पुअर म्हणुन आरक्षण होते. परंतु त्या जागांवर अतिक्रमीत वस्त्या आहे. आपण वरखेडी रोड येथे ७ एकर बायोमायनिंगमधुन जागा मोकळी केली आहे. तया ठिकाणी हा प्रोजेक्ट होवु शकतो.

मा.आयुक्त तथा प्रशासक तेथे ही लोक जातील का.

मा.कार्य. अभियंता तेथे ५० मिटर जवळ कॉलनी आहे. लेआऊट आहे. रेसिडेन्शीअल आरक्षण आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक रिझर्वेशन अनुज्ञेय असेल आणि नागरी वस्ती जवळ असेल तर प्रोजेक्ट करण्यास हरकत नाही.

मा.कार्य. अभियंता यात आपण महाप्रितशी संपर्क केला होता. त्यांनी सांगितले की जागा उपलब्ध करुन द्यावी. खर्च व इतर आम्ही करुन घेवु. यात फक्त लाभार्थी निवड आपल्याला करावी लागेल.

मा.आयुक्त तथा प्रशासक महाप्रित किती घरे बांधु शकते.

मा.कार्य.अभियंता जागेवर डिपेंड आहे. सुरुवातीलार आपण १०० घरांचा प्रोजेक्ट करुन किंवा ५०० घरांचा करु तेवढी जागा उपलब्ध आहे आपल्याकडे, त्यांच्याकडे प्रायव्हेट एजन्सी आहे. त्यांच्यामार्फत ते करतात.

मा.आयुक्त तथा प्रशासक ती ३० चौफुट मिनीमम आहे. आपण ६० चौ. फुट पर्यंत करु शकतो. लाभार्थी असेल २.५ लाख च्या वर पे करण्यासाठी तरी बांधु शकतो.

मा.आयुक्त तथा प्रशासक यात दोन प्रस्ताव ठेवा एक महाप्रितला द्यावा आणि पीएमएवाय अंतर्गत आपण करावा. तसेच लाभार्थी निश्चीतीसाठी जाहिरात प्रसिध्द करावी.

मा.कार्यकारी अभियंता आपल्याकडे पीएमएवाय २.० मधुन ऑनलाईन अर्ज आले आहेत.

मा.आयुक्त तथा प्रशासक पीएमएवाय २.० अजुन लोकांना माहित नाही यात ४ व्हर्टीकल आहे. तया ४ व्हर्टीकलमध्ये कोण लाभार्थी असु शकतो. तसेच व्हर्टीकलचे स्वरुप काय किती घरे मिळणार आहे, किती शासन देणार आहे, लाभार्थ्याला कुठे स्वहिस्सा भरावा लागणार. यासाठी एक जाहिरात प्रसिध्द करावी. आणि डिपीआर मध्ये लाभार्थी निश्चीत झाले की महाप्रितला कळवा तसेच एक कंपोनंट ए एच पी मधुन आपण घ्यावा. शासन निश्चीत चार्जेस प्रमाणे कंन्सल्टंट नेमणुक करावी. आपण जे एम्पॅनल्ड केले कंन्सल्टंट यांचे होकार मागवा. जो तयार होईल त्यांना नियुक्त करावे किंवा कंन्सल्टंट न नेमता मनपा करण्यास कॅपेबल नाही का. आपण डिझाईन नाही करु शकत का.

मा.कार्य.अभियंता हो आपणही करु शकतो फक्त यासाठी प्लॅनिंग करुन करावे लागेल.

मा.आयुक्त तथा प्रशासक जर स्पेशल बिल्डींग असेलतर कंन्सल्टंट ठीक आहे. जर सिंपल डिझाईन असेल तर मनपा स्तरावर करावे. यात लायबलिटी वाढत जाते. आपण केले तर जलद काम होईल. सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक २२८ दिनांक १०/१२/२०२५**

शासन निर्णयानुसार प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० राबविणे बाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.त्यानुसार ज्या लाभार्थ्यांकडे स्व:ताची जागा नसल्यास अशा लाभार्थ्यांसाठी Affordable Housing Project (AHP) या घटका अंतर्गत लाभार्थ्यांना २.५० लक्ष रु.अनुदान स्वरूपात मिळते.तसेच उर्वरित खर्च हा लाभार्थी यांना करावयाचा आहे.

PMAY २.० अंतर्गत आतापर्यंत एकूण ५१३३ ऑनलाइन अर्ज प्राप्त आहेत.सध्यस्थितीत त्यापैकी १०० लाभार्थ्यांसाठी प्रस्ताव तयार करून त्याअंतर्गत दिव्यांग,स्वातंत्र्य सैनिक,माजी सैनिक,विधवा महिला, तृतीयपंथी, सफाई कर्मचारी इ.साठी Special Focussed Group साठी नियोजित आहे.

उक्त योजना राबविणे साठी तसेच जागा निश्चिती करणेकामी नगररचना विभागामार्फत अभिप्राय घेऊन प्रस्ताव शासनाच्या म्हाडा विभागास सादर करून प्रस्तावास म्हाडा विभागाची मान्यता घेणे कामी धोरणात्मक निर्णयासाठी मे.महासभेच्या ठरावाची आवश्यकता असल्याने सदरचा विषय मे.महासभेपुढे ठेवणे बाबत मा.आयुक्त तथा प्रशासक सो. यांनी मान्यता दिली आहे. यास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी व विशेषताः कलम ४५२ अ च्या (१अ) नुसार सदरचा विषय मे.महासभे पुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० अंतर्गत Affordable Housing Project (AHP) या घटका अंतर्गत शासनास प्रस्ताव सादर करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर कामी प्रथम नागरी वस्तीच्या लगतची जागा निश्चीत करावी. वरखेडी कंपोस्ट डेपोलगत असलेल्या स.क्र. ६१/६२ मधील जागा अनुज्ञेय होत असल्यास या जागेवर प्रथम

टप्प्यात PMAY २.० योजनेतून प्रस्ताव तयार करुन शासनाकडे मान्यतेसाठी पाठवावा. तसेच या जागेवर बेघरांसाठी घरे या अंतर्गत घरकुल बांधकामे करण्यासाठी महापीत यांच्याकडेही प्रस्ताव सादर करावा. तसेच प्रधानमंत्री आवास योजनेच्या धर्तीवर प्रस्ताव राबविण्यात यावा. लाभार्थी निश्चीत करणेकामी जाहिरात प्रसिध्द करावी. सदर प्रस्तावाबाबत मनपा स्तरावर प्रकल्प अहवाल तयार करावा. आवश्यकता असल्यास सदर प्रस्तावासाठी शासनमान्य यादीवरील सल्लागार नियुक्तीबाबत कार्यवाही करावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-२२९ — धुळे शहरातील अनधिकृत नळजोडण्या अमृतधारा app द्वारे अधिकृत करणेकामी १ ते ५ बाबींसाठी मान्यता घेणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक् तथा प्रशासक — धुळे मनपा क्षेत्रात अनधिकृत नळ कनेक्शन जोडण्याची संख्या मोठी आहे. अहवालानुसार कमीत कमी ५० हजारपेक्षा अधिक नळ जोडण्या अनधिकृत आहे. यात अनधिकृत नळ जोडण्यांवर ॲक्शन घेवुन उपयोग होणार नाही.त्यापेक्षा अनधिकृत नळ जोडणी अधिकृत करण्याची प्रोजिर अवलंबवायची उदा. जोडणी शुल्क, खोदाई शुल्क, अर्ज शुल्क, दंडात्मक शुल्क हे सर्व आपण डिसाईड करावेव अधिकृत नळ जोडणी करुन त्यांना डिमांड नोटीस बजवावी. हा विषय कागदावर न रहाता त्यांच्या अधिनस्त जे ज्युनियर इंजिनियर आहे आणि त्यांच्या झोनमधील नळ जोडण्या अधिकृत करण्याची कार्यवाही ३ महिन्यात पुर्ण करावी. ३ महिन्यात अनधिकृत नळ जोडण्या अधिकृत नाही केलया तर पाणी उपसा खर्च त्यांच्याकडुन निश्चीत वसुल केला जाईल. तसेच याच विषयाच्या अनुषंगाने ड्रेनेजचा देखील करावा. ज्या नागरीकांनी मनपाची परवानगी न घेता अनधिकृत ड्रेनेज कनेक्शन घेतले त्यांच्याकडुन सर्व प्रकारचे शुल्क आकारुन नियमीत करावे. तसेच ड्रेनेज कनेक्शनची डिमांड नोट देणे सुरु करावे. याची मुदतदेखील ३ महिने राहिल. व त्यानंतर नियमीतपणे ही कार्यवाही सुरु करावी. तसेच एक शासन स्तरावरचा प्रस्ताव पाठवायचा आहे. मान्यता डॉ. बाबासाहेब सामाजिक विकास योजना सन २०२५-२६ अंतर्गत प्रभाग क्र. ७ मध्ये व्हाईट टॅपिंग काँक्रिटीकरण करणे या विषयासही मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक २२९ दिनांक १०/१२/२०२५**

धुळे महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकरिता “अमृतधारा” हे भ्रमणध्वनी एप बनविण्यात आलेले असून ते कार्यान्वयित देखील करण्यात आलेले आहे. सदर app द्वारे नागरिकांना आपल्या भ्रमणध्वनी द्वारे खालील प्रमाणे सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

1.नवीन नळ जोडणी करता आवेदन करणे.
2.सर्व प्रकारच्या तक्रारी अपलोड करणे.
3.पाणी देयकाचे ओनलाईन पद्धतीने भरणा करणे.

आज मितीस धुळे शहरात १,२०,००० नळजोडण्या असाव्यात असा अंदाज आहे (लोकसंख्या ६,००,००० प्रमाणे प्रती कुटुंब ५ माणसे गृहीत धरल्यास ६,००,०००/५ = १,२०,०००) तथापी महानगरपालिका पटावर सुमारे ५७९९९ नळ जोडण्या दिसून येतात. उर्वरित सर्व ठिकाणी अनधिकृत नळजोडण्या असल्याचे निदर्शनास आलेले आहे. उपरोक्त नळजोडण्या अधिकृत करून घेणे अत्यंत आवश्यक आहे.

अमृत २.० अंतर्गत होत असलेल्या धुळे शहर पाणी पुरवठा बळकटीकरणाच्या कामा अंतर्गत १४८०० जलमापके बसवण्याचे काम अंतर्भूत आहे. आज मितीस जलमापके बसविल्यानंतर पिण्याच्या पाण्याचा दर यापूर्वी महासभेने मंजूर केलेल्या ठराव क्र १५० दिनांक ०२.०७.२०१५ मधील मंजूर दर घरगुती भोगवटादारास प्रति घनमीटर रु ८.०० आणि व्यावसायिक आणि संस्थात्मक भोगवटादारास प्रति घनमीटर रु १६.०० नुसार असणार आहे. अदमासे १४८०० जलमापके बसविल्यानंतर त्याचे वाचन घेऊन देयक बनवून वितरीत करण्या करिता स्वतंत्र यंत्रणा नसल्याने प्रशासकीय महासभा क्र ०५ दिनांक २५.०७.२०२४ अनुसार खालील कामांचे स्वरस्याची अभिव्यक्ती आमंत्रित करण्यात आली होती.

1.मीटर वाचन घेणे.
2.मीटर बसवून जोडणी देणेची प्रक्रिया राबवून प्रस्ताव बनवून महानगरपालिकेच्या मंजुरीस ठेवणे.
3.पाणी देयके बनविण्यासाठी आवश्यक असल्यास सोफ्टवेयर ची तरतूद करणे.
4.पाण्याचे देयक छापून ते भोगवटादारास वितरीत करणे.
5.कंत्राट खर्च प्रति देयक अंदाजे रु.५.०० ते रु.१०.०० भोगवटाधारकाच्या देयकात समाविष्ट करणे.
6.मीटर नादुरुस्त असल्यास किमान पाणी वापरा प्रमाणे देयक बनविणे.
7.गृहसंकुल प्रकरणी प्रत्येक सदनिकाधारकास किमान १५ मि. मी. ची जलमापक असलेली घरगुती वापराची जोडणी घेणे अनिवार्य करणे आणि सामान्य पाणीपट्टी रद्द करणे.

या कामासाठी मे. कार्तिक एन्टरप्राइझेस धुळे यांना स्थायी समिती ठराव क्र ५१७ दिनांक १४.०७.२०२५ अन्वये रु.११२.०० प्रती भोगावटादार काम देण्यात आले. या कामा अंतर्गत मे. कार्तिक एन्टरप्राइझेस धुळे यांनी खालील कामे करावयाची आहेत.

1. पाणी पुरवठा विभागाकरिता परिच्छेद १ मध्ये दर्शविलेले अमृतधारा हे भ्रमणध्वनी app बनविणे व संचालित करणे.
2. घरोघरी जाऊन भोगवदाराचे विस्तृत माहिती आणि कागद पत्रे अमृतधारा app मध्ये upload करणे.
3. महानगरपालिका पा.पु. अभियंत्या मार्फत छाननी करून online मंजुरी मिळाल्यानंतर प्रत्यक्ष जोडणी तपासून जोडणी release करणे.
4. विविध भागातील सर्व ग्राहकांची माहिती खात्री करून संकलित करणे. .
5. पाण्याचे देयक छापून ते भोगवटादारास वितरीत करणे.
6. कार्यकारी अभियंत्यांच्या निर्देश अनुसार कार्यवाही करणे.
7. मीटर नादुरुस्त असल्यास किमान वापराचे देयक तयार करणे.
8. जुन्या जोडणीधारकास टप्प्या टप्प्याने महानगरपालिका निर्देशानुरूप अमृतधारा app वर शिफ्ट करून जुन्या जोडणी यादीतून काढून टाकण्याची कार्यवाही व्यवस्थित झाल्याची खात्री करणे.

वरील विषयी काम सुखरूप आणि विना अडथडा पूर्ण होण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणे निर्णय होउन मंजुरी घेणे अत्यंत आवश्यक आहे.

1.ज्या मालमत्ता धारकाचे घरी मालमत्ता कर लागु आहे पण नळ जोडणी महानगरपालिका रेकॉर्डला दिसून येत नाही, अशा जोडणीस रु. ५०७०.०० मात्र लागू करून जोडणी कायम करून घेणे. मालमत्ता धारक कागद पत्रे देण्यास अथवा विहित रकमा देण्यास तयार होत नसल्यास सदर रक्कम येत्या बिलात थकबाकी स्वरुपात पाठवणेस मंजुरी घेणे.

2.ज्या मालमत्ताना समक्ष पाहणी करता नळ जोडणी आढळून येते परंतू त्या मालमत्तेस मालमत्ता कर लागू झालेला नाही. अशा मालमत्ताना रु.५०७०.०० मात्र लागू करून जोडणी अमृतधारा app द्वारे कायम करून घेणे.

3.ज्या मालमत्ताना समक्ष पाहणी करता एका पेक्षा अधिक नळजोडण्या आढळून येतात त्यांना अस्तित्वातील जोडणी संख्ये इतक्या जोडण्या मंजूर करून तितकी देयके देण्याची मंजुरी घेणे.

4.भागात सर्वेक्षण झाल्यावर जुन्या ५७९९९ जोडण्या टप्प्या टप्प्याने अमृतधारा app वर दर दोन महिन्याने देयक तयार होण्याची सोय असल्याने, वार्षिक रु.१६९०.०० चे समान ६ हप्ते पाडून दोन महिन्यातून एकदा देयक बनवून पाठवण्याच्या विषयास मंजुरी घेणे.

5.मे. कार्तिक एन्टरप्राइझेस धुळे यांच्या रु.११२.०० प्रती भोगवटादार या दराने १५००० जलमापकाच्या बिल बनवणे आणि वितरीत करणेच्या कामाचा दर मंजूर आहे. उर्वरित सुमारे १००००० जोडणी धरकाचे रेकॉर्ड अमृतधारा वर घेणे आणि देयक बनून वितरीत करणेच्या कामाची इ निविदा मागवणेस मंजुरी घेणे.

उपरोक्त अनुक्रमांक १ ते ५ विषयास मे महासभेची मंजुरी घेणे आवश्यक असल्याने उपरोक्त विषय मे महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, धुळे शहरातील अनधिकृत नळजोडण्या अमृतधारा app द्वारे अधिकृत करणेकामी १ ते ५ बाबींसाठी कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

याकामी प्रभागनिहाय कनिष्ट अभियंता नियुक्त करुन त्यांच्या मार्फत सदरची कार्यवाही 3 महिन्याच्या आत पुर्ण करावी. मुदतीत कार्यवाही पुर्ण न झाल्यास संबंधीतांवर जबाबदारी निश्चीत करावी. तसेच शहरात ड्रेनेज लाईन जोडणी परवानगी न घेता जोडणी केलेली आहे सदर बाबही या कार्यवाहीत तपासण्यात यावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-२३० श्री यलम्मा माता रेणुका माता मंदिर मालेगाव रोड समोरील जीर्ण अवस्थेत असलेली मुतारी पाडणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.सहा. अभियंता धुळे मनपा हददीतील मालेगाव रोड भागात श्री. यलम्मा माता मंदिरासमोर मनपा मालकीच्या ३ सीटच्या दोन मुतारी आहेत. तयातील १ मुतारीचे बांधकाम जीर्ण असुन ते पाडणेकामी पत्र प्राप्त झाले आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक जीर्ण आहे हे कसे निश्चीत केले. आपण आपल्या स्तरावर निश्चीत करु शकत नाही. स्ट्रक्चरल स्टॅबिलीटी करुन घ्यावी. त्या रिपोर्टमध्ये जीर्ण आढळले तर निष्कासित करा. सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक २३० दिनांक १०/१२/२०२५**

धुळे मनपा हद्दीतील मालेगाव रोड भागात श्री.यलम्मा माता मंदिरा समोर बर्फ कारखाना रस्ता व मालेगाव रोड लगत मनपा मालकीच्या ३ सीटच्या दोन मुतारी असुन दोन्ही मुतारी मंदिरासमोर असुन श्री काळुबाईमाता देवस्थान स्वागत कमानीच्या खाली आहे.दोन्ही मुतारी पाडणे बाबत उक्त संदर्भानुसार पत्र प्राप्त झालेले असता जागेवर जाऊन प्रत्यक्ष पाहणी केलेली असुन मालेगावरोड दर्शनी भागात ३ सीटच्या मुतारीचे बांधकाम १० ते १५ वर्षापुर्वीचे असुन सदर मुतारीचे बांधकाम जीर्ण अवस्थेत आहे.तसेच त्यामागील दुसरी ३ सीटच्या मुतारीचे बांधकाम ६ वर्षापुर्वीचे असुन बांधकाम सुस्थितीत आढळून आलेले आहे.

मागणी पत्रानुसार दोन्ही मुतारीचा उपयोग नागरिकांसाठी होत आहे किंवा नाही याबाबत सार्वजनिक आरोग्य विभागाला जा.क्र./धुमपा/बां.वि./५६/२०२५ दि.२८/१०/२०२५ व जा.क्र./धुमपा/बां.वि./६७/२०२५ दि.०३/१२/२०२५ नुसार पत्र दिलेले आहे.तरी त्याबाबत अभिप्राय अप्राप्त आहे.वरीलप्रमाणे सद्यास्थिती असुन मुतारीचे बांधकाम पाडणे बाबत निर्णयाकरिता सदरचा विषय मंजुरीसाठी मे.महासभेपुढे सादर झालेला आहे. उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार श्री यलम्मा माता रेणुका माता मंदिर मालेगाव रोड समोरील जीर्ण अवस्थेत असलेली मुतारी निष्कासित करणेस विभागाच्या अभिप्रायानुसार मान्यता देण्यात येत आहे.

याबाबत प्रथम संरचनात्मक क्षमता (स्ट्रक्चरल स्टॅबिलिटी) तपासण्यात यावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

**मे. महासभेच्या बैठकी प्रसंगी मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी दिलेले निर्देश**

१)रिव्हाईज बजेटची तयारी सुरु करावी. ते वेळेवर झाले तर अडचणी येणार नाही.

२)स्वच्छता विभागाने प्राधान्याने आर ओ ऑफिस स्वच्छतेची कार्यवाही करावी.

३) मतदान केंद्राच्या दुरुस्ती सुरु कराव्या.

४) निवडणुक विभागाने सगळया शासकीय, नीमशासकीय कर्मचाऱ्यांच्या याद्या मागवाव्या. याद्या जनगणनेसाठी लागणार आहे.

५)ज्या ज्या विभागातील कर्मचाऱ्यांकडे सर्व कागदपत्रे उपलब्ध आहे. त्यांना आयुष्यमान भारत कार्ड काढणेसाठी तयारी सुरु करावी.सर्वांनी आयुष्यमान भारत कार्ड काढणे आवश्यक आहे.

६)मानधन वरील संगणक ऑपरेटर यांची यादी लवकर तयार करावी. तसेच शहरातील कॉम्प्युटर खाजगी संस्था असेल त्यांच्याशी संपर्क करुन त्यांच्याय परिक्षा घ्याव्या. ही कामे निवडणुकीपुर्वी करावी.

**तद्नंतर मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या आदेशाने राष्ट्रगीत गायनानंतर बैठक समाप्त करण्यात आली.**

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**